## नाशिकमधील भूखंड गैरव्यवहार
# उपविभागीय अधिकाऱ्याचे निलंबन

**मुंबई (प्रतिनिधी)–** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील मौजे संगमेश्वर आणि गुगळगाव येथील भूखंड अदलाबदलीतील गैरव्यवहार प्रकरणी उपविभागीय अधिकारी उदय किसवे यांचे तात्काळ निलंबन करण्यात येत असल्याची घोषणा महसूल चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. तसेच या प्रकरणी आठ मुद्रांक अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे आदेश देत बावनकुळे यांनी दोषींवर कडक कारवाईचे संकेत दिले. तसेच स्टॅम्पवेंडर जाकीर आणि आरिफ अब्दुल लतीफ यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात मौजे संगमेश्वर येथील सिटी सर्व्हे क्र. १४४ अ आणि मौजे गुगळगाव येथील गट क्र. २५३ यांच्या बिनशेती परवानगीशिवाय झालेल्या गैरव्यवहाराबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, २००२ च्या परिपत्रकानुसार भूखंड किंवा शेतीच्या अदलाबदलीसाठी जमिनी सलग असणे आवश्यक आहे. परंतु, उदय किसवे यांनी संगमेश्वरची जमीन गुगळगावला आणि गुगळगावची जमीन संगमेश्वरला स्वॅप करून नियमांचा भंग केला. यामुळे त्यांचे निलंबन करत एका महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण करून कठोर कारवाई करण्याचे आश्वासन बावनकुळे यांनी यावेळी दिले.

# आता कर्जाच्या प्री-पेमेंटवर दंड भरण्याची गरज नाही

## आरबीआयकडून मोठा दिलासा

**नवी दिल्ली–** रिझर्व्ह बँकेने कर्जदारांना मोठा दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नवीन नियमानुसार, आता बँका आणि वित्तीय संस्था फ्लोटिंग रेट कर्जांवर कोणताही प्री-पेमेंट किंवा फोरक्लोजर शुल्क आकारू शकणार नाहीत. हा नियम वैयक्तिक आणि व्यावसायिक कर्जांना लागू होईल. विशेषतः सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी खूप फायदेशीर ठरेल.

हा नवीन नियम १ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर मंजूर होणाऱ्या किंवा नूतनीकरण होणाऱ्या सर्व कर्जांना लागू होईल. आतापर्यंत ही सूट फक्त वैयक्तिक कारणांसाठी कर्ज घेतलेल्या लोकांनाच उपलब्ध होती. परंतु आता आरबीआयने व्यवसाय कर्जांचाही समावेश करण्यासाठी आपली व्याप्ती वाढवली आहे. ज्यामुळे लहान व्यावसायिकांना दिलासा मिळेल. आरबीआयने आपल्या परिपत्रकात म्हटले आहे की, देशातील लहान व्यवसायांना सोपे, पारदर्शक आणि परवडणारे वित्तपुरवठा प्रदान करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी असे दिसून आले आहे की बँका आणि एनबीएफसी वेगवेगळे नियम पाळतात, ज्यामुळे ग्राहकांमध्ये वाद होतात. म्हणूनच आता संपूर्ण व्यवस्था एकसमान करण्यात आली आहे. नवीन नियमानुसार, मोठ्या व्यावसायिक बँका, उच्च स्तरीय एनबीएफसी, अखिल भारतीय वित्तीय संस्था आणि शहरी सहकारी बँकांना आता एमएसई आणि वैयक्तिक व्यावसायिकांकडून कोणत्याही प्रकारचे प्री-पेमेंट शुल्क आकारावे लागणार नाही. लहान बँका आणि एनबीएफसी ५० लाख रुपयांपर्यंतच्या बिगर-व्यवसाय कर्जांवर देखील कोणतेही शुल्क आकारणार नाहीत. तसेच, ग्राहकाने स्वतःच्या पैशाने किंवा इतर कोणत्याही निधीने कर्ज फेडले तरी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच लॉक-इन कालावधीही नसेल. याशिवाय हे नियम कॅश क्रेडिट आणि ओव्हरड्राफ्ट खात्यांना देखील लागू होतील, जर ग्राहकाने वेळेवर माहिती देऊन खाते बंद केले तर. सरकारकडूनही मदत मिळेल. लघु उद्योजकांना सुलभ कर्ज देण्यासाठी लघु उद्योग विकास बँक ऑफ इंडिया स्वस्त कर्जे आणि संशोधन निधीमध्ये मदत करेल. सध्या भारतात अनेक एमएसई कंपन्या सक्रिय आहेत, ज्यात ६०० हून अधिक ड्रोन आणि तंत्रज्ञान स्टार्टअप्सचा समावेश आहे. अशा परिस्थितीत, हे पाऊल लहान व्यापाऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करेल. तसेच कर्ज परतफेड करण्याची प्रक्रिया सुलभ करेल, अशी अपेक्षा अर्थतज्ज्ञांना आहे.

# शिर्डी साई रूरल इन्स्टिट्यूटच्यावतीने आज दिंडी सोहळा

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** शिर्डी साई रूरल इन्स्टिट्यूट, प्रवरानगर या संस्थेच्या वतीने आज शनिवारी विठ्ठल रखुमाई पायी दिंडी सोहळाचे आयोजन राहाता शहरात करण्यात आले आहे.

या सोहळ्यामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि डॉ. बाळासाहेब विखे पाटील इंटरनॅशनल स्कूलमधील ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. संस्थेच्या संचालिका धनश्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजता दिंडीचा प्रारंभ होणार आहे. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आणि शालिनीताई विखे पाटील उपस्थित राहाणार आहेत. पायी दिंडीची सुरुवात राहाता येथील वीरभद्र महाराज मंदिरापासून होणार आहे. संपूर्ण शहरातून पुन्हा वीरभद्र महाराज मंदिर प्रांगणात येणार आहे. तेथे रिंगण सोहळा होईल. दिंडीमध्ये संस्थेच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सेवकवर्ग यांचा सहभाग असून, संपूर्ण रथ व दिंडी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे. वारीच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या नेमण्यात आल्या असून, प्रत्येकास विशिष्ट जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. सर्व सहभागी सदस्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडून ही अध्यात्मिक यात्रा संस्मरणीय व्हावी, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे यांनी व्यक्त केली.

# ५ लाख २१ विद्यार्थ्यांनी घेतला शाळेत थेट एसटीपास योजनेचा लाभ

## परिवहनमंत्री सरनाईक यांची माहिती

**मुंबई–** १६ जूनपासून शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येत आहेत. केवळ १५ दिवसात म्हणजे १६ जून ते ३० जूनपर्यंत तब्बल ५ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जूनपासून सुरू झाल्या. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत १ लाख ६१ हजार २०४ विद्यार्थ्यांना त्यांच्या, त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जातात. या अंतर्गत ३ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थिनींना त्यांच्या शाळेत जाऊन पास वितरित करण्यात आले. यापूर्वी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापन कडून पास घेतले जात असत. आता विद्यार्थ्यांना पास साठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा-महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येत आहेत.दरम्यान, जूनपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. लाखो विद्यार्थी एसटीच्या बसेसने शाळेला जातात. त्यांच्यासाठी हजारो शालेय फेऱ्या एसटीने सुरू केलेल्या आहेत. परंतु विविध कारणांनी काही फेऱ्या अचानक रद्द केल्या जातात, अशा तक्रारी शालेय विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून येत आहेत. विशेषतः आदिवासी पाडे आणि दुर्गम भागातील शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना एकच बस फेरी उपलब्ध असल्याने. ती रद्द झाल्यास त्यांची प्रचंड गैरसोय होते. त्यामुळे यापुढे प्रत्येक आगार प्रमुखांनी कार्यक्षेत्रातील शालेय फेरी कोणत्याही परिस्थितीत रद्द होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत.

# ३ ऑक्टोबरला अभिजात मराठी भाषा दिवस

## मार्गदर्शक सूचना जाहीर

**पुणे–** मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला तो दिवस म्हणजे ३ ऑक्टोबर आता अभिजात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ३ ऑक्टोबरपासून अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येणार असून, त्या संदर्भात मराठी भाषा विभागाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

मराठीला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची सुमारे अडीच हजार वर्षांची परंपरा गृहीत धरण्यात आली आहे. प्राचीन ग्रंथांची, लिपींची, व्यवहाराची आणि विविध कला प्रकारातील भाषा विविध समाजघटकांपुढे येण्यासाठी, मराठीचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्याबरोबरच भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, भाषेतील संशोधनासंदर्भात जनजागृती व्हावी या उद्देशातून दर वर्षी ३ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा दिवस, तसेच ९ ऑक्टोबरपर्यंत मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे प्रसारित केले आहे.

# पत्नीचा खून करुन मुलास फाशी देणाऱ्या नराधम बापास जन्मठेप

## जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** पत्नीच्या डोक्यात कुदळीने घाव घालून तिचा निर्घृण खून करणारा आणि सात वर्षीय मुलास आंब्याच्या झाडाला गळफास देऊन ठार मारणाऱ्या नराधम पित्याला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. बलराम दत्तात्रय कुदळे (रा. खैरी निमगाव) असे आरोपीचे नाव आहे.

सदर घटना १४ एप्रिल २०२२ रोजी घडली होती. बलरामचा विवाह अक्षता प्रकाश बोरावके (रा. श्रीरामपूर) हिच्याशी २८ मे २०१५ रोजी झाला होता. विवाहानंतर ती खैरी निमगाव येथे सासरी नांदत होती. त्यांना शिवतेज नावाचा मुलगाही झाला होता. काही काळाने ते वस्तीवर रहायला गेले होते. बलरामने एका क्षुल्लक कारणावरून पत्नी अक्षताच्या डोक्यात कुदळीने घाव घालून तिचा खून केला. त्यानंतर त्याने आपल्या सात वर्षीय मुलास आंब्याच्या झाडाला गळफास देत ठार मारले. इतक्यावरच न थांबता आरोपी बलरामने या अमानुष कृत्याचा फोटो काढून पत्नीच्या भावाला व्हॉट्सॲपवर पाठवला आणि त्याला व्हिडिओ कॉल करून तुला यायचं नाही का? मी तुझ्या बहिणीला आणि भाच्याला मारून टाकलं आहे. सात वर्षांचा संसार झाला, एक मुलगा झाला, अजून काय हवं? या प्रकाराची माहिती मृताचा भाऊ महेश बोरावके यांनी श्रीरामपूर शहर पोलिसांना दिली होती. अक्षताचे वडील प्रकाश बोरावके यांनी याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली होती.

श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटला जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्ग १ एस. एन. साळवे यांच्या न्यायालयात चालविण्यात आला. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील पी. पी. गटणे आणि एस. ए. दिवेकर यांनी काम पाहिले. खटल्यात एकूण १५ साक्षीदार तपासण्यात आले. सर्व साक्षी व पुरावे विचारात घेता न्यायालयाने आरोपी बलराम कुदळे यास दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या गुन्ह्याच्या तपास व सुनावणी प्रक्रियेत पोलीस उपनिरीक्षक वी. आर. घाणे, सहायक फौजदार पठाण, मुख्य हवालदार बर्डे, हवालदार ठोंबरे आदींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार

**मुंबई–** सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल न्यायमूर्ती भूषण गवई यांचा महाराष्ट्र विधान मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात येणार आहे.

८ जुलै रोजी दुपारी दोन वाजता विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. यानिमित्ताने न्यायमूर्ती गवई हे विधिमंडळाच्या सदस्यांना मभारताची राज्यघटनाफ याविषयावर संबोधित करणार आहेत. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी याबाबतची घोषणा सभागृहात केली.

## देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातील याचिका निकाली

**नागपूर–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य आमदारांची आमदारकी रद्द करण्याची याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली होती. काँग्रेसचे उमेदवार प्रफुल गुडधे पाटील यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी होवू ती निकाली काढण्यात आली आहे. यात नागपूर खंडपिठाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बाजूने निकाल दिला आहे.

# राहाता तालुक्यात ३७ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरण्या

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता तालुक्यात यंदा खरीप हंगामाला वेळेआधीच सुरूवात झाली असून आज अखेर तब्बल ३७ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६४ हजार ८९५.७९ हेक्टर असून खरीपाचे सरासरी क्षेत्र ४४ हजार ४४७ हेक्टर आहे.

यंदा मान्सूनचे आगमन साधारण १५ दिवस आधी झाल्याने पेरण्या वेळीच झाल्या असून शेतकऱ्यांकडून युरियाच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून कृषी विभागाने २८० मेट्रिक टन युरिया संरक्षित साठा मंजूर केला आहे. यातील १४० मेट्रिक टन युरिया १ जुलै रोजी खुला करण्यात आला असून ३ जुलै रोजी उर्वरित १४० मेट्रिक टन संरक्षित साठाही शेतकऱ्यांसाठी खुला करण्यात आला आहे.

दरम्यान, डीएपी खताचा पुरवठा मर्यादित असल्याने पर्यायी मिश्र खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. डीएपीमध्ये १८ टक्के नत्र व ४६ टक्के स्फुरद असते. त्याऐवजी लिक्विड नॅनो डीएपी, तसेच १०:२६:२६, १२:३२:१६, २०:२०:०, २४:२४:० या मिश्र खतांचा योग्य प्रमाणात वापर करूनही परिणाम साधता येतो. यासोबतच युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट व पालाश यांच्या मिश्रणाचा वापर डीएपीला पर्याय ठरतो. तसेच मोनो अमोनियम फॉस्फेट व प्रोम डीएपी चा वापरही शेतकरी करू शकतात. तालुक्यातील शेतकऱ्यांनी उपलब्धतेनुसार पर्यायी खतांचा वापर करावा व अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### झेडपी, पंचायत समितीसाठी...

या अनुषंगाने मतदान केंद्रांचे नियोजन करून मतदान केंद्राची संख्या निश्चित करावी, तसेच तेथे मतदारांसाठी विविध सुविधा पुरवाव्यात, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्याच्या निवडणूका होणाऱ्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि पालिका मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत. राज्यात लवकरच जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगर पालिका यांच्यासह महानगर पालिकांच्या निवडणूकांचा बिगूल वाजवणार आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली गतिमान झाल्या आहेत. सध्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या तसेच पालिकांमध्ये आणि महानगर पालिकांमध्ये प्रभागरचनेचा कार्यक्रम राबविला जात आहे. येत्या दीड ते दोन महिन्यांत प्रभागरचना अंतिम केल्या जातील. एकीकडे ही प्रक्रिया सुरू असतानाच राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्रांची संख्या निश्चित करावी, असे आदेश यंत्रणांना दिले आहेत. तसेच प्रत्येक मतदान केंद्रात जास्तीजास्त आणि कमीत कमी किती मतदार असावेत, याबाबत सुचना काढल्या आहेत.

यासह मतदान केंद्र तयार करताना मतदारांना प्राधान्य देण्याच्या सूचना केल्या आहेत. साधारणतः मतदाराला त्याच्या घरापासून दोन किलोमीटरच्या आत मतदान केंद्र उपलब्ध करून द्यावे. ग्रामीणमध्ये वाड्या-वस्त्या, दुर्गम भाग, विरळ लोकसंख्येचा विचार करून मतदान केंद्राची निर्मिती करावी. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू शकते. त्यामुळे मतदान केंद्रांमध्ये मंडप, पिण्याच्या पाण्याची व बसण्यासाठी सुविधा, मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसह ईव्हीएम ठेवण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करून द्यावी, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

### शिंदेंच्या ‘जय गुजरात’वरून वादंग

गुजरात पाकिस्तान आहे का? असा सवाल यावेळी शिंदे यांनी केला. मराठीबद्दल कोणी आम्हाला शिकवू नये. त्या लोकांनी पुण्यातील लोकांसाठी काम केलं म्हणून मी त्यांची प्रशंसा केल्याचे शिंदे म्हणाले.

या टीकेला प्रत्युत्तर देताना फडणवीस म्हणाले की, एखाद्या नेत्याने गुजराती समाजात गेल्यानंतर जय महाराष्ट्र, जय गुजरात असे म्हणणे यात गैर काहीही नाही. आपण महाराष्ट्रात राहिल्यानंतर मराठी शिकावी, असा आग्रह करू शकतो. पण दुराग्रह धरू शकत नाही. मी उद्या तामिळनाडूमध्ये गेल्यानंतर कोणीही मला तमिळ शिकण्याचा दुराग्रह करू शकत नाही. यावर अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सावध प्रतिक्रिया दिली. या कार्यक्रमात त्यांनी असा नारा दिल्याची मला माहिती नाही. मी कार्यक्रमात असेपर्यंत तसे काही झाल्याचे मला आठवत नाही, असे त्यांनी सांगितले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यात लक्ष घातल्याने गेल्या वर्षात मराठीला हा दर्जा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

**शिंदे अमित शहांचे गुलाम**

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वाभिमानाचा प्रदेश आहे. स्वराज्यासाठी शिवरायांनी सुरतेवर स्वारी केली होती. पण आज छत्रपती शिवरायांच्या राज्यात एकनाथ शिंदेंसारख्या गुलामांनी महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला आहे. सत्तेसाठी लाचार झालेला माणूसच महाराष्ट्रातील कार्यक्रमात जय गुजरातची घोषणा देऊ शकतो. शिंदे हे अमित शहांचे गुलाम आहेत, अशी घणाघाती टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी केली. शिंदे यांनी महाराष्ट्राची मान शरमेने खाली घातली. शिंदे गुजरातचे नाही तर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत याचा त्यांना विसर पडला का? असा सवाल करत सपकाळ यांनी एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

### आशा-अंगणवाडी सेविका...

केंद्र सरकार जीवन मिशन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमामध्ये ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध व सुरक्षित पाणी उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची तपासणीसाठी क्षेत्रीय तपासणी संचाच्या (फिल्ड टेस्ट किटच्या) माध्यमातून स्थानिक लोकांना सक्षम करण्यात येत आहे. याकरिता प्रती महसूल गावात पाच महिलांची निवड करण्यात आली असून, या महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षित महिलांकडून पाण्याची तपासणी करण्यात येत आहे. ग्रामपंचायत स्तरावर गावनिहाय पाणी गुणवत्ता तपासणीकरिता महसूल गावनिहाय पाच महिलांना जैविक फिल्ड टेस्ट किटबाबत प्रशिक्षण दिले आहे. या प्रशिक्षित महिलांच्या माध्यमातून एकाच दिवशी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जैविक एफटीके (बाटली) व रासायनिक एफटीके वापरून तपासणी करण्यात येत आहे. त्यासाठी शासनाकडून फिल्ड टेस्ट किट प्राप्त झाले असून, त्याचे तालुकापातळीवर वाटप करण्यात आले आहे.

जिल्ह्यात जलजन्य आजार होऊ नयेत. तसेच पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता उच्चप्रतीची राखली जावी, तसेच पाणी गुणवत्ता कार्यक्रम महिलांना आपलासा वाटावा. ग्रामीण भागातील पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी स्थानिक पातळीवर सरक्षित व स्वच्छ पाणीपुरवठा सुनिश्चित करणे, एफटीकेच्या वितरण व वापरासाठी जनजागृती हा या मागचा शासनाचा हेतू आहे. जिल्ह्यात २०२१ मध्ये प्रत्येक गावातून यासाठी पाच महिलांची निवड करण्यात आलेली आहे. या महिलांमध्ये महिला बचत गट प्रतिनिधी, आशा आणि अंगणवाडी सेविकांचा समावेश आहे.

**स्थानिकांचा सहभाग वाढणार**

रासायनिक एफटीके तपासणीत क्लोराईड, एकूण कठीणपणा, अल्कलीनी, लोह, नायट्रेड, फ्लोराइड, अवशेष क्लोरीन, पी. एच, गढूळपणा याची तपासणी करण्यात येणार आहे. या किटच्या माध्यमातून आता ग्रामपंचायतस्तरावर पिण्याच्या पाण्याची तपासणी शक्य होणार आहे. तसेच स्थानिक लोकांचा सहभाग वाढणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्याच्या जलस्त्रोताचे नियमित पाणी परिक्षण करता येणार असल्याचे सांगण्यात आले.

**किटचा पुरवठा किती?**

अकोले १८९, जामखेड ७६, कर्जत ११६, कोपरगाव ७९, नगर १११, नेवासा १३०, पारनेर १३०, पाथर्डी३४, राहाता ५८, राहुरी ९६, संगमेनर १७१, शेवगाव ११३, श्रीगोंदा ११४, श्रीरामपूर ५५ अशा जिल्ह्यातील १ हजार ५७५ गावांसाठी पाणी शुध्दीकरणाची किट वितरण करण्यात आले आहे.

### मोहरमसाठी पोलिस यंत्रणा सज्ज

यामध्ये कोतवाली हद्दीतील १०३, तोफखाना हद्दीतील १६२ व भिंगार हद्दीतील १७४ जणांचा समावेश आहे. यासह मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

दोन दिवस चालणाऱ्या मोहरमच्या मिरवणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिसांनी व्यापक तयारी केली आहे. शहरातील मोहरम मिरवणुकीच्या संपूर्ण मार्गाची पोलिसांकडून पाहणी करण्यात आली. मिरवणूकदरम्यान कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी यंग पार्टी, मंडळ प्रतिनिधी यांच्याशी बैठका घेऊन संवाद साधण्यात आला आहे. शांतता राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मोहरमच्या काळात शहरात भक्कम पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, विविध ठिकाणी टेहाळणी मनोरे, सीसीटीव्ही नियंत्रण, तसेच गस्त वाढवण्यात आली आहे.

दरम्यान, शनिवारी (दि. ५) रात्री १२ वाजता ‘कत्तलची रात्र’ मिरवणुकीला कोठला भागातून सुरूवात होणार आहे. कोठला-फलटण चौक, कोंड्यामामा चौक येथून मंगलगेट हवेली येथील बारा इमामची भेट झाल्यानंतर दोन्ही सवाऱ्या मुख्य मिरवणुकीत सहभागी होतात व मुख्य ‘कत्तलची रात्र’ मिरवणुकीस प्रारंभ होतो. त्यानंतर सदरची सवारी मिरवणूक सरदार पटेल रस्ता, आडते बाजार चौक, तेलीखुंट, शहाजी चौक, मोची गल्ली, जुना कापड बाजार, भिंगारवाला चौक, अर्बन बँक रस्ता, लक्ष्मीबाई कारंजा, पटवर्धन चौक, सबजेल चौक, पांचपीर चावडी, जुना बाजार रस्ता, बुरूडगल्ली, हातमपुरा चौक, नालबंद खुंट, रामचंद्र खुंट, किंग्ज रोड, ब्राम्हण कारंजा, मंगलगेट हवेली, कोंड्यामाम चौक, फलटण चौक, कोठला या मार्गाने काढण्यात येते. त्यानंतर मोहरम विसर्जन मिरवणुकीला रविवारी (दि. ६) दुपारी १२ वाजता सुरूवात होणार आहे. दुपारी १२ वाजता कोठला येथुन छोटे बारा इमाम यांची सवारी उठविण्यात येऊन कोठला मैदानामध्ये पाचफेऱ्या मारल्यानंतर सदरची सवारी मिरवणूक एक वाजता कोठल्याच्या बाहेर पडते. त्यानंतर फलटण चौक, कोंड्यामामा चौक ते मंगलगेट हवेली या मार्गाने आल्यानंतर पुन्हा मोठे १२ इमाम यांची भेट होते व मुख्य विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ होतो. त्यानंतर सदर विसर्जन मिरवणूक ही मंगलगेट, दाळमंडई मार्गे, पिंजार गल्ली, पारशाखुंट, ख्रिस्त गल्ली, बुरूडगल्ली, जुना बाजार रस्ता, पंचपीर चावडी, सबजेल चौक, चौपाटी कारंजा, दिल्लीगेट, निलक्रांती चौक मार्गे सावेडी गावात विसर्जन होते.

**असा असेल बंदोबस्त**

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक २, पोलीस उपअधीक्षक ४, पोलीस निरीक्षक ११, सहायक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक ४०, पोलीस अंमलदार ६५०, एसआरपीएफचे दोन प्लॅटून, क्यूआरटीचे दोन प्लॅटून, होमगार्ड १०० या शिवाय मिरवणुक मार्गावर सीसीटीव्ही व ड्रोन कॅमेऱ्यांची नजर असणार आहे.

### पहिल्या फेरीत प्रवेश न घेतल्यास...

ऑनलाइन प्रवेश प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना ७ जुलैपर्यंत प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. ऑनलाइन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करण्यासाठी व अर्जाचा भाग-एक भरणे, नियमित फेरी-एकमध्ये नोंदणी अपूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना ७ जुलैपर्यंत माहिती भरून अर्ज पुन्हा सबमिट करता येणार आहे. याशिवाय नियमित फेरी-दोनमधील अर्जाचा भाग-दोनमधील महाविद्यालयांचा पसंतीक्रम देण्याची सुविधा १० ते १३ जुलैपर्यंतच असणार आहे. या काळात ज्या विद्यार्थ्यांना अद्याप प्रवेश मिळालेला नाही किंवा ज्यांनी अर्धवट अर्ज भरला, त्यांनी सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदलता देखील येणार आहे, पण ही प्रक्रिया मुदतीत पार पाडावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. अकरावी प्रवेशासाठी पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली, महाविद्यालय मिळूनही अनेक विद्यार्थी त्याठिकाणी प्रवेश घेत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना थेट चौथ्या खुल्या प्रवेश फेरीत सहभागी होऊन प्रवेश घेता येईल, अशी अट सध्या आहे. पण, या विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीत सहभागी होता यावे, यासाठी शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. जेणेकरून, अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळेल हा हेतू असल्याचे शिक्षण विभागाच्या सुत्रांकडून सांगण्यात आले.

### भंडारदरा पाणलोटात पावसाचा...

भंडारदरा धरणातून ३९४९ क्युसेकने प्रवरा नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे.

गेली चार-पाच दिवस पावसाचे चांगलीच हजेरी लावल्याने धरणांत मोठ्या प्रमाणात नवीन पाणी जमा झाल्याने पाणीपातळी दिवसागणीक वाढत गेली. त्यामुळे यंदा धरण जुलै महिन्यातच ओसंडण्याची शक्यता आहे. गेल्या २४ तासांत (शुक्रवारी सकाळी ६ वाजेपर्यंत) भंडारदरा धरणात ३८७ दलघफू तर निळवंडेत २८१ दलघफू नवीन पाणी जमा झाले आहे. अजूनही पावसाच्या रिमझिम सरी कोसळत असल्याने नवीन पाणी धरणाच्या पोटात विसावत आहे. दरम्यान, प्रवरा नदी वाहती झाल्याने लाभक्षेत्रात आनंदाला उधाण आले आहे.

### मुळा धरण ५६ टक्के भरले

पाणी पातळीत चांगली वाढ झाली. मात्र, गुरुवारी रात्री पावसाचा जोर कमी झाल्याने काल सकाळी आवक ५ हजार ३२७ क्युसेसवर आली. पाणीसाठा १४ हजार ४७१ दलघफू झाला होता. परंतू काल पाणलोट क्षेत्रातील घाटमाथ्यावर पावसाने पुन्हा ठेका धरल्याने आवक सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ती ८ हजार २८ क्युसेस झाली. पाणीसाठा १४ हजार ७०४ दलघफू झाला आहे. तर धरणात गेल्या २४ तासात ६१४ दलघफू व आतापर्यंत एकूण ५ हजार ७९८ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली आहे.